पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक ४२

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ३०/१२/२००८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १७३८**

मा.सौ.सुलोचना तुपे यांचे दि. २२/१२/२००८ चे पत्र.

हडपसर स.नं. २२३/४ अ पारिजातक कॉलनीमध्ये इंटरलॉकींग ब्लॉक बसवून ट्रिमिक्स पध्दतीने रस्ता गदादे यांचे घरापासून सिरम कंपनी रस्त्यापर्यंत रस्ता कॉंक्रीट करण्याचे १० लाखाचे हडपसर क्षेत्रिय कार्यालय येथे टेंडर मंजूर झालेले आहे व वर्कऑर्डरही दिलेली आहे.

सदर विभाग मनपा नविन हद्दीमध्ये आहे. सदर रस्ता गुंठेवारीमध्ये आहे. सदर विभागातील बांधकामे गुंठेवारी पध्दतीने झालेली आहेत. सदर रस्ता अनधिकृत ले–आऊट करुन मुळ मालकाने भुखंड विकताना खरेदी खतामध्ये रस्ता व रस्त्याचा वापर करण्याचे हक्कही दिलेले आहेत व त्यातील रस्त्याचा काही भाग मुळ मालकांच्या नावाने व त्यांच्या नातेवाईकांच्या नावावर शिल्लक आहे. सदर अनधिकृत ले–आऊटमधील भूखंडाची विक्री झालेपासून सदर रस्ता नागरिकांच्या १८ वर्षापेक्षा जास्त काळ वहिवाटीचा आहे. सदर भागातील नागरिकांनी रस्ता ताब्यात देण्याचे सामुहिक पत्रही दिलेले आहे. सदर रस्त्याचा मालक व त्यांचे नातेवाईक एफ.एस.आय.मागतात व रस्ता करणेसाठी अडथळा आणतात. दि. ९/५/२००५ रोजी मा.सहाय्यक आयुक्त यांचे समवेत झालेल्या निर्णयानुसार कलम २ व ३ मध्ये दिलेल्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३ अन्वये स्थायी समितीची मान्यता घेऊन मा.महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेने नोटीस देवून रस्ता करण्यास मान्यता घ्यावी. मा.मुख्य सभा ठराव क्र. १९३ दि. २३/८/२००२ अन्वये समाविष्ठ गावातील गुंठेवारी पध्दतीने झालेल्या क्षेत्रातील रस्त्याबाबत मुद्दा क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी व ठरावाची अंमलबजावणी बाबत मा.महापालिका आयुक्त यांची मान्यता घ्यावी व रस्ता करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र. १७३९**

मा.प्रमोद भानगिरे यांचे दि. २२/१२/२००८ चे पत्र.

वॉर्ड क्र. ९६ महंमदवाडी स.नं. ११ ही जागा गायरान असून सदर ठिकाणी मिनी मार्केट उभारण्यात यावे. त्यासाठी सन २००९–२०१० च्या आर्थिक अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यात यावी.

**विषय क्र. १७४०**

मा.ॲड्.अविनाश साळवे, मा.विरेंद्र किराड, मा.महादेव बाबर, मा.सौ.मंगला मंत्री व मा.दिलिप उंबरकर यांचे दि. २२/१२/२००८ चे पत्र.

पुणे मनपाच्या नगरसचिव कार्यालयाकडील निवृत्त सुपरवायझर श्री.अनिल शंकर काटकर यांची नगरसचिव कार्यालयाकडे रेकॉर्ड किपर या पदावर दि. १७/१/२००९ पासून करार पध्दतीने सहा महिनेकरीता नेमणूक करण्यात यावी.

**विषय क्र. १७४१**

मा.दिपक गावडे व मा.सागर माळकर यांचे दि. २३/१२/२००८ चे पत्र.

वॉर्ड क्रं.११४ पर्वती जनता वसाहत येथे १० लक्ष लिटर्स क्षमतेची पाण्याची टाकी बांधणेसाठी र.रु. २५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

UnRegistered

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे, पान नं. २३२, अ.क्र. ५, सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे, (यादी एस-१९), पान क्र. ३०४, अ.क्र. ३४, वॉर्ड क्र. ११४ जनता वसाहत साईबाबा मंदिर व राममंदिर परिसरातील डोंगरावर सुलभ शौचालय बांधणे | १५ लाख | --- |
| पान क्र. ११४ सुवर्णयुग मंडळ परिसरातील डोंगरावर सुलभ शौचालय बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं.११४ पर्वती जनता वसाहत येथे १० लक्ष लिटर्स क्षमतेची पाण्याची टाकी बांधणे | --- | २५ लाख |

**विषय क्र. १७४२**

मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी व मा.बाळासाहेब कापरे यांचे दि. २४/१२/२००८ चे पत्र.

वॉर्ड क्रं. १४ त्रिदलनगर येथे ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम सुरु असून हे काम पूर्ण करणेसाठी असणारी तरतूद कमी पडत असल्याने त्यासाठी र.रु. १५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-३३, पावसाळी लाईन टाकणे, अ.क्र. ६, वॉर्ड क्र. १४ त्रिदल परिसरात पावसाळी लाईन टाकणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं. १४ त्रिदलनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १५ लाख |

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्रं. १७४३**

दि. ८/१२/२००८ ते दि. १४/१२/२००८ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण २२ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/१०४७ दि. १८/१२/२००८ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. १७४४**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २/८/२००८ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २९/११/२००८ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/६६४ दि. २२/१२/२००८ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ९,४७,८१८/- चा तक्ता माहितीसाठी.

Unregistered

**विषय क्र. १७४५**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २६/७/२००८ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २२/११/२००८ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/६६५ दि. २२/१२/२००८ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १८,७२,७७०/- चा तक्ता माहितीसाठी.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्रं. १७४६**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील बुधवार पेठ भाग विभागाकडील सन १९९८-९९ व सन १९९९-२००० मधील मिळकतकरांच्या ठरावबंदाची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं. मुलेप/२१६९ दि. २९/९/२००७ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ६ सन २००७-०८ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी क्रं. मआ/मुले/१०६१ दि. २२/१२/२००८ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता-ब.

**विषय क्रं. १७४७**

नगर अभियंता खात्याकडील बिबवेवाडी भाग–३ विभागाकडील सन १९९८–९९ मधील बांधकाम प्रकरणी आकारणी विभागाने भोगवटापत्रा (कंम्प्लीशन सर्टीफिकेटस) शिवाय आकारणी केलेल्या जागांची अे फॉर्मवरुन वसूल करावयाची जागा वापर तडजोड फी बाबत तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं. मुलेप/३८१ दि. ३१/१/२००८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. १६ सन २००७–०८ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी क्रं. मआ/मुले/१०६२ दि. २२/१२/२००८ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता–ब.

**विषय क्रं. १७४८**

बांधकाम खात्याकडील सन १९९९–२००० ते २००५–०६ मधील विकास शुल्क तसेच तदनुषंगिक जमा फी च्या आकारणीचे तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं. मुलेप/४५० दि. १२/३/२००८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. २६ सन २००७–०८ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी क्रं. मआ/मुले/१०६३ दि. २२/१२/२००८ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता–ब.

**विषय क्रं. १७४९**

आयातकर कार्यालय खातेदार विभागाकडील खातेदार मे.चौगुले इंडस्ट्रीज लि. व मे.चमाडिया अॅण्ड सन्स यांनी सन १९९७–९८ व १९९८–९९ मध्ये आयात केलेल्या मालाचे मासिक टिपणपत्र तक्ते तदनुषंगिक कागदपत्रांची हिशोब तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं. मुलेप/४११ दि. ५/८/२००१ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ४२ सन २०००–०१ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी क्रं. मआ/मुले/१०६४ दि. २२/१२/२००८ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता–ब.

**विषय क्रं. १७५०**

आयातकर खात्याकडील खातेदार वेकफिल्ड इंटरनॅशनल कॉर्पोरेशन व मे.वेकफिल्ड प्रॉडक्टस कंपनी यांचेकडे आयात झालेल्या मालाची टिपणपत्रे व तदनुषंगिक कागदपत्रांची सन १९९८–९९ व १९९९–२००० मधील हिशोब तपासणीमधील आक्षेपार्ह बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं. मुलेप/४१५ दि. ३०/३/२००२ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ६९ सन २००१–०२ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी क्रं. मआ/मुले/१०६५ दि. २२/१२/२००८ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता–ब.

**विषय क्रं. १७५१**

आरोग्य खात्याकडील गणक विभागाकडील सन २०००–२००१ मधील हिशोबांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं. मुलेप/५३८ दि. ३१/३/२००३ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ७० सन २००२–०३ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी क्रं. मआ/मुले/१०६६ दि. २२/१२/२००८ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता–ब.

**विषय क्रं. १७५२**

आयातकर कार्यालयाकडील खातेदार विभागाकडील खातेदार एल.जी.इलेक्ट्रॉनिक्स लि. यांनी सन २०००–२००१ व २००१–२००२ मध्ये आयात केलेल्या मालाच्या मासिक टिपणपत्र तक्त्यांची हिशोब तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं. मुलेप/७८२ दि. ५/३/२००५ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. १०३ सन २००४–०५ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी क्रं. मआ/मुले/१०६७ दि. २२/१२/२००८ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता–ब.

UnRegistered

**विषय क्रं. १७५३**

आयातकर कार्यालयाकडील खातेदार मे.फिलिप्स इंडिया लि. यांनी सन १९९६–९७ ते २००३–२००४ मध्ये आयात केलेल्या मालाच्या मासिक टिपणपत्र तक्त्यांची हिशोब तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं. मुलेप/९१९ दि. ११/५/२००५ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. १२० सन २००४–०५ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी क्रं. मआ/मुले/१०६८ दि. २२/१२/२००८ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता–ब.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्रं. १७५४**

पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्याकडे विविध पदांवर ६ महिने मुदतीसाठी दि. ११/१०/२००८ पासून ते दि. १०/४/२००९ पर्यंत खालील सेवकांच्या करार पध्दतीने दरमहा एकवट मोबदला रुपये १५,०००/– वर घेण्यात आलेल्या सेवा मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(जिंघ)/से/१०४८ दि. १८/१२/२००८ चे पत्र.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव | पदांचे नांव | खाते |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती गुजराथी सिमा मनमोहनदास | सोशल ॲण्ड कम्युनिटी डेव्हलपमेंट ऑफीसर | नागरवस्ती विकास योजना |
| २ | श्री.तायडे भैया मारोतराव | --,,-- | --,,-- |
| ३ | श्री.कोंगे प्रकाश गणपतराव | --,,-- | --,,-- |
| ४ | श्री.व्याघ्रांबरे समीर वसंत | पब्लिक हेल्थ इंजिनिअर | घनकचरा व्यवस्थापन कार्यालय |

**विषय क्रं. १७५५**

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेत खालील २ उमेदवारांना असिस्टंट केमिस्ट या पदाचे वेतनश्रेणीचे सुरवातीचे मुळ वेतन रुपये ४,५००/– धरुन त्यावर देय होणारे सर्व भत्ते मिळून होणारी एकवट रक्कम (अंदाजे रुपये ११,२७५/–) इतक्या एकवट मोबदल्यानुसार असिस्टंट केमिस्ट या पदावर सहा महिन्यांकरीता करार पध्दतीने घेणेत आलेल्या सेवा मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमातील कलम ७३ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उद्यान/से/१०५० दि. १८/१२/२००८ चे पत्र.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव |
|---|---|
| १) | सौ.दिपाली योगेश शेलार |
| २) | श्री.जीवन संभाजी मनाळे |

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्रं. १७५६**

सहाव्या वेतन आयोगापोटी मे.राज्य शासनाच्या धोरणानुसार मनपा सेवक व सेवानिवृत्त सेवकांनाही किमान रुपये १०,०००/– दिवाळीपूर्वी देण्याबाबत मा.वसंत मोरे व मा.संदिप लडकत यांचे दि. १३/१०/२००८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११९८ दि. ६/११/२००८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी क्र. मआ/मुले/१०४६ दि. १८/१२/२००८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. १७५७**

वॉर्ड क्र. ५ मधील आदर्श जनसेवा प्रतिष्ठान शांतीनगर संस्थेस समाजउपयोगी कार्यक्रम राबविणेसाठी वॉर्ड क्र. ५ मधील जुना आळंदी रोड (चपाती कारखाना) शेजारी असलेल्या मोकळी जागा नाममात्र भाड्याने व दिर्घ मुदतीच्या कराराने देणेबाबत मा.सौ.नंदाताई कांबळे व मा.सौ.रिना पवार यांचे दि. २३/९/२००८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११०७ दि. ६/१०/२००८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी क्र. मआ/उआ(भुजिं)/१०५२ दि. १८/१२/२००८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

UnRegistered

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्रं. १७५८**

वॉर्ड क्र. १४४ संतोषी माता लगतच्या चार गल्ल्या व विठ्ठलमंदिराच्या लगतच्या चार गल्ल्या साईडपट्टी ग्राऊट करुन पेव्हर करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.धनराज ॲस्फॉल्ट कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २४,९९,७८३/- पेक्षा ८.९९% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. २७,२४,५१३=४९ पर्यंत तसेच डांबर, सिमेंट या तिन्ही मटेरिअलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधीन राहून काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/उआ(विका क्र.४)/१०४५ दि. १८/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७५९**

समाविष्ट गावातील क्लोरीनेशन डोसींग यंत्रणेची सेवकवर्गासह वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.देशकुल क्लोरीनेशन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २३,५०,८९८/- पेक्षा ॲटपर दराने) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २३,५०,८९८/- पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/पापु/१०५५ दि. १९/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७६०**

स्फुर्ती सोसायटी येथील रस्ते डांबरी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार मे.के.टी.कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३६,९९,५३४/- पेक्षा १०.५१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३३,१०,७१२=९८ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच सिमेंट, स्टील व डांबर यांचे बाजारभावानुसार फरक अदा करणेस/कपात करणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/उआ(विका क्र.१)/१०५८ दि. २०/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७६१**

वॉर्ड क्र. १२१ बहिरोबा नाल्यात गंगा सॅटेलाईट ते कोंढवा दशक्रिया विधी घाटापर्यंत व एन.आय.बी.एम.रोडवर बहिरोबा नाल्यापासून एन.आय.बी.एम.पर्यंत, एन.आय.बी.एम.सिध्दार्थनगर व सोसायट्यांच्या परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.विनोद मुथा यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५९,४९,८३२/- पेक्षा १७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ४९,३८,३६०=५६ अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढनुसार (स्टाररेट) सुत्रानूसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/मलनि/प्र/१०५९ दि. २०/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७६२**

वॉर्ड क्र. १३३ स.नं. १८ ते स.नं. २६ धनकवडी आंबेगाव शिव रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.एस.के.ऐवले यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,७४,८६९/- पेक्षा १८.३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २४,३०,४६७=९७ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच सिमेंट, स्टील व डांबर यांचे बाजारभावानुसार फरक अदा करणेस/कपात करणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०६० दि. २२/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७६३**

खराडी स.नं. ५४ व ५६ मधील १२ व १८ मी.डी.पी.रस्ता ग्राऊट करुन विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडसपैकी ठेकेदार मे.राधालक्ष्मी कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,०८,४४,८०४/- पेक्षा २७.२९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७८,८५,२५६=९९ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, स्टील यांचे बाजारभावानुसार फरक अदा करणेस/कपात करणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०६९ दि. २२/१२/२००८ चे पत्र.

Unregistered

**विषय क्रं. १७६४**

पुणे–सोलापूर रोड आकाशवाणी सिरम रोड ते गणेश विहारपर्यंत ८ इंच व ६ इंच व्यासाची पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.प्रतिक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८,९९,९९६/– पेक्षा २९.९% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ११,६९,०९४=८० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/पापु/१०७० दि. २२/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७६५**

वॉर्ड क्र. १०९ वारजे पेट्रोल पंपामागील नाल्यावर कल्व्हर्ट बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.शिंदे ॲण्ड शिंदे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५३,४०,४५५/– पेक्षा १८.२२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ४३,६७,४२४=१० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०७१ दि. २२/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७६६**

पावसाळ्यापुर्वी नगर उपअभियंता (पथ ४) च्या कार्यक्षेत्रातील कसबा–विश्रामबागवाडा, सहकारनगर, बिबवेवाडी, धनकवडी, टिळकरोड क्षेत्रिय कार्यालयांतर्गत विविध रस्त्यांवर डांबरीकरणासाठी मिक्स माल पुरविणे व पेव्हरच्या साह्याने पसरविणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.टी.जी.धमाणी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४,९९,९९,८३८/– पेक्षा २.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४,८८,७४,८४१=६५ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, स्टील यांचे बाजारभावानुसार फरक अदा करणेस/कपात करणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०७२ दि. २३/१२/२००८ चे पत्र.

Unregistered

**विषय क्रं. १७६७**

हिंगणे खुर्द स.नं. ३३ ते ४ उर्वरित रस्ता करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.अक्षय डेव्हलपर्स ॲण्ड कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २५,४९,५७५/– पेक्षा २८.५५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. १८,२१,६७१=३४ पर्यंत तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरिअलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधीन राहून काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०७४ दि. २३/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७६८**

ऑर्चिड पॅलेस ते महंमदवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील जुने कल्व्हर्ट काढून नविन कल्व्हर्ट करणे (जुने पाईप कल्व्हर्ट काढून आर.सी.सी.कल्व्हर्ट बांधणे) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.कैलास बिरामणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४२,४०,५५६/– पेक्षा १८.२२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३४,६७,९२६=७० पर्यंत काम करुन घेण्यास तसेच सिमेंट, स्टील व डांबर यांचे बाजारभावानुसार फरक अदा करणेस/कपात करणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०७५ दि. २३/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७६९**

साऊथमेन रस्ता येथे फुटपाथ व काँक्रीट चॅनेल करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.बी.के.ओरसे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३३,९९,३५४/– पेक्षा २८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २४,४७,५३४=८८ पर्यंत तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरिअलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधीन राहून काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०७६ दि. २३/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७७०**

बंगलोर हायवे सिंहगड रोड डी.पी.रोडवरील ओढ्यावरील पूल बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.कैलास बिरामणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६९,४२,९९७/– पेक्षा १४.९१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५९,०७,७९६=१५ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, स्टील यांचे बाजारभावानुसार फरक अदा करणेस/कपात करणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०७७ दि. २३/१२/२००८ चे पत्र.

## एकच टेंडर प्रकरणे

**विषय क्रं. १७७१**

वॉर्ड क्र. १५ महाराष्ट्र हौसिंग बोर्ड येथे ६ इंच व्यासाची सी.आय.पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार शर्मा कन्स्ट्रक्शन यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. १८,०५,६३८/– पेक्षा २२% जास्त) असल्याने त्यांचेकडून रु.२२,०२,८७८=३६ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/पापु/१०५७ दि. २०/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७७२**

वॉर्ड क्र. १३६ बालाजीनगर येथील अक्षय हॉटेल ते लोणकर बिल्डींग, रविकिरण बिल्डींग ते तारु फिश मार्केट ते एकता महिला मंडळ येथील रस्ता करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.रत्नदिप एंटरप्रायझेस यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. २९,७३,४७४/– पेक्षा ९.५०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३२,५५,९५४=०३ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच सिमेंट, स्टील व डांबर यांचे बाजारभावानुसार फरक अदा करणेस/कपात करणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०७३ दि. २३/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७७३**

नगर उपअभियंता क्र. ३ यांचे कार्यक्षेत्रातील वारजे क्षेत्रिय कार्यालय व कर्वे रस्ता क्षेत्रिय कार्यालयाच्या क्षेत्रातील विविध मुख्य रस्त्यांवर पावसाळी लाईन टाकणे व ग्राऊट करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.सनराज कन्स्ट्रक्शन यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. २,१६,२७,४५८/– पेक्षा १.२८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २,१३,५०,६२६=५४ पर्यंत काम करुन घेण्यास व टेंडर कालावधीत डांबर/सिमेंट व स्टील यांचे दरात होणारी वाढ/घट त्यानुसार ठेकेदारास अदा/वसूल करणे यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०७८ दि. २३/१२/२००८ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्रं. १७७४**

पुणे रल्वेस्टेशन जवळील मोलेदिना हॉल येथे बहुमजली वाहनतळ व चौकातील भुयारीमार्ग या कामाचे ठेकेदार मे.ओ.एन.जी.व्ही.असोसिएट्स (जॉइंटव्हेंचर ) यांचेकडून प्रस्तावित योजनेतील फेज १ ची कामे पूर्वगणित रक्कम रू. १५,५१,२०,०००/– ची दिडपट र.रू.२३,२६,८०,०००/–पर्यंत काम करून घेणेस म्हणजेच मूळ टेंडर रक्कम वजावट करून वाढीव र.रू.७,७५,६०,०००/– पर्यंत वाढीव कामे मूळ टेंडरची अटी व शर्तीस अधीन राहून करून घेणेस व ठेकेदाराशी सुधारित करारनामा करून घेणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/वानि/६७९ दि.६/१०/२००८ चे पत्र

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १६/१२/२००८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १७७५**

पुणे, पेठ पाषाण स.नं. १४०/२ पैकी टी.डी.आर.पोटी भूमि आणि जिंदगी विभागामार्फत दि. ११/८/२००८ रोजी मनपाच्या ताब्यात आलेल्या ३६२१.२५ चौ.मी.क्षेत्राची तडजोडीने भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाली असल्याने सूसरस्ता व सूसरस्ता ते बाणेर–पाषाणशीव रस्ता या ३६ मी.डी.पी.रस्त्यासाठी चालू असलेल्या मिळकतीची भूसंपादन कार्यवाहीतून वगळणेबाबत (भूसंपादन कार्यवाही रद्द करणेबाबत) मा.जिल्हाधिकारी, भूसंपादन शाखा, पुणे, मा.विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १६, पुणे व विकास योजना कार्यालयास कळविणेत येत असल्याची बाब अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूसं/९८७ दि. ६/१२/२००८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १६/१२/२००८ च्या सभेत ठरले होते.)

Unregistered

## संकिर्ण

**विषय क्रं. १७७६**

अंदाजपत्रकामध्ये विविध सार्वजनिक संस्थांचे नांवे मान्य झालेल्या देणगीच्या रकमा त्यांना अदा करण्याबाबत झालेला विधी समिती ठराव क्र. ३२ दि. १७/१२/२००८ विचारासाठी.

**विषय क्रं. १७७७**

गंगाजळी निधीचे बचत खात्यातून र.रुपये ३ कोटी रोख स्वरुपात शिल्लक आहेत. त्याचा व्याजासहीत योग्य तो जमाखर्च व तांत्रिक बाबी पूर्ण करणेस तसेच कर्जाची परतफेड गंगाजळी निधीतून करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/१०४९ दि. १८/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७७८**

महानगरपालिका सदस्यांप्रमाणे शिक्षण मंडळ सदस्यांना सुधारित दराने मानधन वाढवून मिळणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/शिक्षण मंडळ/१०५१ दि. १८/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७७९**

अंदाजपत्रकातील मान्य तरतुदीमधुन रक्कम रुपये १ कोटी ५० लाखाचे वर्गीकरण आरोग्य कार्यालय, पुणे मनपा १) आरई१८अे–१०४, ८–मा.सभासदांसाठी व सेवकांसाठी आरोग्य सहाय्य योजना (आप्र.), क–सेवकांसाठी आरोग्य सहाय्य योजना, ४–ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य विमा योजना र.रुपये ९० लाख, २) आरई१८अे–११३, ८–मा.सभासद व सेवकांसाठी आरोग्य सहाय्य योजना (आप्र.), ६–मिळकतकर लवकर भरणेसाठी विमा योजना र.रुपये ४० लाख, ३) आरई१८अे–११५, ८–मा.सभासद व सेवकांसाठी आरोग्य सहाय्य योजना (आप्र.), क–सेवकांसाठी आरोग्य सहाय्य योजना, १४–पुणे शहरात कार्य करणाऱ्या रक्तपेढ्यांना अनुदान र.रुपये २० लाख या खात्यातून आरोग्य कार्यालय, पुणे मनपा, सन २००८–०९, पान क्र. १४४, भाग–३ भांडवली निधी व खर्चाची कामे, ५–लोकारोग्य, सीई१५अे २५०/१२०, कोंढवा येथे कत्तलखाना बांधणे या खात्याकडे वर्ग करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे क्रं. मआ/मुले/१०५३ दि. १८/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७८०**

खोदाई चार्ज अनामत पोटी जमा केलेले रकमेतून पोल शिफ्टींग विभागातील टेंडर अन्वये करावयाचे कामांबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नउपअ(पोशि)/१०५४ दि. १९/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७८१**

अंदाजपत्रकातील मान्य तरतुदीमधून र.रुपये २ लाखाचे वर्गीकरण कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय, ७.रुग्णालये, प्रसुतिगृह, औषधालये, आरई१७अे२०२, क.२ रुग्णालये, प्रसुतिगृहे, औषधालये, १) भवन दुरुस्ती या खात्यातून मा.क्षेत्रिय अधिकारी, कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय, १.मुख्य देखरेख वसूली व इतर, आरई११डब्ल्यू१०२बी, १) कायम सेवकवर्ग र.विभागीय कार्यालय, २) संकिर्ण या खात्याकडे वर्ग करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे क्रं. मआ/मुले/१०५६ दि. १९/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७८२**

स्थायी समिती सभा प्रसंगी चहापान व खाद्यपदार्थ मागविण्यात आले असून त्याप्रित्यर्थ संबंधित बजेटहेडवर खर्ची टाकून संबंधितास बिले आदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.उपनगरसचिव यांचे क्र. ४८४५ दि. २३/१२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १७८३**

पुणे शहरातील झोपडपट्ट्यातील गरिबांसाठी व पुणे शहरात राहणाऱ्या दारिद्र्यरेषेखालील पिवळे रेशनकार्ड धारक नागरिकांसाठी मनपामार्फत आरोग्य विमा राबविणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नावियो/१०७९ दि. २४/१२/२००८ चे पत्र.

Unregistered

**विषय क्रं. १७८४**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील सन १९९३–९४ मधील रविवार पेठ विभागाकडील मिळकतकरांच्या ठरावबंदाची व तदनुषंगिक इतर कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या दोषास्पद आक्षेपार्ह बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं. मुलेप/२८२ दि. १८/९/१९९८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ११ सन १९९८–९९ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्रं. मआ/मुले/१०८० दि. २४/१२/२००८ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता–ब.

**विषय क्रं. १७८५**

दि. १५/१२/२००८ ते दि. २१/१२/२००८ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण २७ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/१०८१ दि. २४/१२/२००८ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. १७८६**

वॉर्ड क्र. २२ मुळा रोड येथे महिला बचत गट प्रशिक्षण केंद्र बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.शर्मा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २४,९८,७२७=५० पेक्षा १३% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २८,२३,५६२=०८ पर्यंत (उपलब्ध तरतुद र.रुपये १५,००,०००/– पर्यंत) काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/उआ(क्र.१)/१०८२ दि. २४/१२/२००८ चे पत्र.

सुनिल पारखी
उपनगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

UnRegistered